सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र. 020-26123371 टोल फ्री - 1077 E-Mail: controlroompune@gmail.com

**जावक क्र.: आव्यप्रा/ 334 / 2026** **दिनांक : 05/07/2026**

**वाचले** -१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१९९/एसडी-२ दि.०२/०८/२०१९

३) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र. १९९/एसडी-२ दि. २३/१२/२०१९

४) विभागीय उपसंचालक मुंबई यांचेकडील पत्र क्र. सिउर्स माध्यमिक/संकिर्ण/२०२२/७०७७, दि.१३/०७/२०२२

५) भारतीय हवामान विभाग मुंबई यांचेकडील पूर्वसूचना दिनांक ०५/०७/२०२६.

---

**आदेश,**

**ज्याअर्थी**, उक्त वाचले क्र. ४ अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व वाचले क्र.२ च्या शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी पुणे जिल्ह्याला अतिवृष्टीचा (Thunder and lightning in Pune) रेड अलर्टचा इशारा देण्यात आलेला असून पुणे जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये घाट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होत आहे. तरी पुणे जिल्ह्यातील सर्व शाळा दि.०६/०७/२०२६ रोजी बंद ठेवणे आवश्यक असल्याचे माझे मत आहे. याकरिता नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे या सर्व बाबींचे अवलोकन करता पुणे जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा यांना दिनांक ०६/०७/२०२६ रोजी सुट्टी जाहिर करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबईच्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पुणे जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांना (जिल्हा परिषद, नगरपालिका, आश्रमशाळा, खाजगी शाळा, अनुदानित व विना अनुदानित खाजगी शाळा, इंग्लिश मिडीयम शाळा, सर्व अंगणवाडी) दिनांक ०६/०७/२०२६ रोजी सुट्टी जाहिर करीत आहे. तथापि, या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे.**

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक ०५/०७/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

**(जितेंद्र डूडी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.**

**प्रत - सर्व संबंधितांस**

**-----------------------------------**

**------------------------------------**

DDM / Rushikesh